# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/03/2023 (सोमवार) दुपार

---

## विनयभंग

**१) पो.स्टे. सावनेर :–** दिनांक २३/३/२०२३ चे १६/१९ वा. दरम्यान फिर्यादी/पीडिता वय ५३ वर्ष व गावातील इतर महिला यांची गावातील शेत जमीन डब्ल्यूसीएल आदासा माईन मध्ये गेली आहे तेथे कोळसा खोदाईचे काम सुरू आहे. शेतजमीनीच्या मोबदल्यात गावातील लोकांना बरोबर पैसे मिळाले नसल्याने दि. २४/३/२०२३ चे सकाळी ११.०० वाजे पासून कोठोडी गावाला असलेल्या खदान चे रस्त्यावर गावातील ४० ते ५० महिला व पुरूष आंदोलन करणे करीता बसले असता दोन्ही आरोपी नामे– १) श्री. विलास चौधरी २) अतुल तिवारी दोन्ही रा. डब्ल्युसीएल वाघोडा सावनेर हे पेन्डाल मध्ये आले व फिर्यादीला हात लावून धक्काभुक्की करून खाली पाडुन फिर्यादीचा विनयभंग केला तसेच सोबत असलेल्या महिला यांना सुदधा पेन्डाल मध्ये येवून धक्का भुक्की करून विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३२३, ३४ भादवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ राठोड ब न ७४२ पो स्टे सावनेर मो. क्र. ९८२३०७४७४२ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. केळवद :–** दिनांक २६/०३/२०२३ चे १५/३० वा. दरम्यान फिर्यादी/पीडिता वय ३३ वर्ष ही कामठी येथे बाजार करण्यासाठी जात होती तेव्हा आरोपी नामे– राजेंद्र नारायणसिंग यादव, रा. कामठी हा फिर्यादी सोबत वारंवार भेटुन फिर्यादी सोबत मैत्री करण्याचा प्रयत्न करीत होता. दिनांक २६/०३/२०२३ रोजी दुपारी ०३/३० वाजता चे दरम्यान फिर्यादीच्या मोठ्या आईचा मुलगा याचे कडे फिर्यादीला पैश्याची आवश्यकता असल्याने फिर्यादीने त्याला भेटण्या करिता ढाबा खूरजगाव शिवार येथे स्वत:च्या स्कुटी ने आली होती तेव्हा फिर्यादी भावाला भेटून परत जात असताना आरोपी राजेंद्र नारायणसिंग यादव रा. कामठी हा आला व फिर्यादीला शिवीगाळी करुन म्हणाला कि, “१०००/– रुपये देतो तु माझ्या सोबत चल” असे म्हणुन फिर्यादीला ढकल ढुकल करुन फिर्यादीचा विनयभंग केला व जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ५०४, ५०६ भादवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि आत्राम मो. नं. ९१९४०५१९४३१७ हे करीत आहे.

**<u>३) पो.स्टे. खापा</u>** :— दिनांक २५/०३/२०२३ चे १४/०० वा. दरम्यान फिर्यादी/पीडिता वय ३२ वर्ष ही तिचे पति सोबत गावातील अमोल जगणे यांचे शेतात रोजमजूरीने कापूस वेचण्याकरीता गेले होते. त्यावेळी अमोल जगणे व त्याची पत्नी सौ. भारती जगणे हे सुध्दा होते. दोघेही शेतात कापूस वेचत असताना अंदाजे दूपारी ०२/०० वा. सूमारास भारती जगणे हिला गावातील आरोपी नामे— जिवन बाबूराव केळवदे, वय ३३ वर्ष, रा. नागलवाडी ता सावनेर जि. नागपूर हा शेताचे कंपनीच्या मागे धूऱ्याजवळील तिवारी विटभट्टाचे रोडजवळ लपून बसल्या सारखा दिसल्याने तिने आरोपीस हटकले असता जिवन हा भारती सोबत अरेरावी करू लागला तेव्हा फिर्यादीने त्या ठिकाणी जावून आरोपीला समजविण्याचा प्रयत्न केला तर तो फिर्यादी सोबत सूध्दा अरेरावी करू लागला व शेताचे कुंपण ओलांडून फिर्यादी जवळ येवून फिर्यादीचा डावा हात पकडून फिर्यादीला लज्जा येईल असे कृत्य करू लागल्याने फिर्यादी जोरात ओरडल्याने फिर्यादीचे पती आणि जिवण जगणे हे फिर्यादी कडे येत असल्याचे पाहताच पून्हा पाहून घेण्याची धमकी देत फिर्यादीचा हात सोडून पळून गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ भादवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास स.फौ प्रमोद बंन्सोड ब. नं ४६३ पोस्टे खापा मो. नं ९९२३४१०२२३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**